रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).

दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएस/ मंदिर/ 6351 /२०१८

दिनांक:- 26 FEB 2018

प्रति,

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

## निविदा/ दरपत्रक मागणी

## माहे-एप्रिल- सन २०१८ ते माहे- मार्च-२०१९ करीता

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मंदिर विभागामार्फत फुटाणे प्रसाद, विडयाचे पाने, मान्यवरांचे सत्कारासाठी पावडर मार्बल मुर्ती खरेदीकामी दरपत्रक/ निविदा मागणी करण्यात येत आहे.

| अ.नं. | तपशिल | वार्षीक मागणी | प्रमाण | डिपॉझिट रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | चांगल्या प्रतीचे व स्वच्छ चणा-फुटाणा | ४५० | किलो | २,५००/- |
| ०२ | नागीनीचे(विडयाची) पाने (आवश्यकतेप्रमाणे) | २,००,००० | नग | १०,०००/- |
| ०३ | पावडर मार्बल मुर्ती(आवश्यकतेप्रमाणे) | | | |
| | अ)०३ नंबर मुर्ती (उंची ७.५ इंच) | १०० | नग | १,०००/- |
| | ब) ०४ नंबर मुर्ती (उंची ९ इंच) | ३०० | नग | १,०००/- |
| | क) ०५ नंबर मुर्ती (उंची १३.५ इंच) | १५० | नग | १,०००/- |

उपरोक्त तपशीलात नमूद केलेले साहित्य पुरविणेचे कोटेशन खालील अटी व शर्तीस अधिन राहून देणेचे करावे.

**अटी व शर्ती**:-

१. सर्व साहित्यांचे दर जी.एस.टी. नियमांसहीत व करांसहित शिर्डी येथे पोहचविणेचे असे सर्व समावेशक असावे, वेगळी हमाली, वाहतूक व इतर कर खर्च दिला जाणार नाही. वेळेवर मालाचा पुरवठा केला नाही व त्यामुळे संस्थानला दुसरीकडून माल खरेदी करावा लागला तर त्यासाठी जादा द्यावी लागणारी रक्कम आपले डिपॉझीट मधून कपात करणेत येईल. ती रक्कम परत मिळणार नाही व परत मागता येणार नाही. कमी झालेली रक्कम पुर्तता करुन पूर्ण करावी लागेल.
२. कोटेशन सोबत जी.एस.टी.नंबर व पॅन नंबर जोडणेचे करावे.
३. सदरचे सिलबंद कोटेशन दि.20/03/२०१८पर्यंत रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत आपले फर्मचे लेटरहेडवरील सीलबंद पाकीटात निविदा/ दरपत्रक शिर्डी येथे संस्थानचे आवक विभागाकडे दिलेल्या वेळेत पोहचणे आवश्यक आहे. पाकिटावर **मंदिर विभागाकरीता फुटाणेकरीता/ विडयाचे पानेकरीता/ पावडर मार्बल मुर्तीकरीता निविदा** असा स्पष्ट उल्लेख करावा. मागणीप्रमाणे मालाचे दरपत्रक द्यावे. अपुर्ण, उशीरा आलेले तसेच चुकीच्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
४. मंदिर विभागाचे मागणीप्रमाणे मालाचा पुरवठा विनाविलंब करावा लागेल.
५. संस्थानकडून कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम (अॅडव्हान्स) दिली जाणार नाही.
६. प्रत्येक निविदाधारकास फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी असेल.
७. यशस्वी दरपत्रक हे मंदिर विभागामार्फत दरपत्रकासाठीच्या विनंतीमध्ये नमुद केलेल्या गरजांची पूर्तता करणारे सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक असेल.
८. निविदेसोबत सविस्तर माहितीपत्रक उपलब्ध असल्यास सोबत जोडावे.
९. दरपत्रके मान्य झाल्यास वरील नमुद केल्याप्रमाणे संस्थानकडे वर्षभर अनामत रक्कम (सिक्युरीटी डिपॉझीट) विना व्याज ठेवावी लागेल. शर्ती व अटीचा भंग केल्यास डिपॉझीटची रक्कम जप्त करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

(धनंजय निकम)
उपजिल्हाधिकारी

मुख्य कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
यांचेकरीता....

मुंबई : साईनिकेतन, ८०४, ब, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४
दुरध्वनी : +९१-२२-२४१६६५५६ फॅक्स : +९१-२२-२४१५०७९८. टेलिग्राम – साईनिकेतन, मुंबई.
● Website : http://www.shrisaibabasansthan.org / www.sai.org.in ● Email : saibaba@sai.org.in.